RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ४६(२)] बुधवार, एप्रिल ११, २०१८/चैत्र २१, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १०५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### पर्यावरण विभाग

१५वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ एप्रिल २०१८.

### अधिसूचना

क्रमांक प्लास्टीक-२०१८/प्र.क्र. २४/तां. क. ४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाद्वारे प्लास्टीक व थर्माकॉल इत्यादींपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियमन करण्याकरिता, दिनांक २३ मार्च २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन , वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ प्रसिध्द करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेच्या परिच्छेद ८ नुसार भविष्यात या नियमनांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे वा अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळे वा त्रुटी यावर वेळोवेळी निर्णय घेणे इत्यादींसाठी व इतर अविघटनशील कचऱ्यावर नियमनाबाबत निर्णय घेण्यासाठी दिनांक २२ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये शक्तीप्रदत्त समिती गठीत करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, प्लास्टीक उत्पादक संघटनांबरोबर झालेल्या चर्चेच्या व त्यांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शक्तीप्रदत्त समितीच्या दिनांक २८ मार्च २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ या अधिसूचनेमध्ये काही सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली होती ;

त्याअर्थी, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम ४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना, २०१८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. परिच्छेद ३ (२) पुढीलप्रमाणे वाचावा :—

"राज्यात खाद्यपदार्थ साठविण्यायोग्य उच्च दर्जा प्राप्त बिसफेनॉल-अ विरहित पीईटी व पीईटीई पासून बनविलेल्या व ज्यावर पुनर्चक्रणासाठी पुर्वनिर्धारित पुनर्खरेदी किंमत ठळकपणे छापलेली असेल अशा बाटल्यांचा वापर, उत्पादन, खरेदी, विक्री व साठवणूक खालील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल :-

(अ) उत्पादक, वितरक व विक्रेते यांनी पर्यावरणासंबंधी विस्तारित जबाबदारी म्हणून अशा पुर्वनिर्धारित पुनर्खरेदी किंमत निश्चित केलेल्या पीईटी व पीईटीई बाटल्यांच्या पुनर्चक्रणासाठी पुनर्खरेदी ठेव व्यवस्था (बाय बॅक डिपॉझीटरी सिस्टम)

निर्माण करून पुरेशी क्षमता असलेले संकलन केंद्र, रिव्हर्स व्हेंडीग मशीन, क्रशींग मशीन व पुनर्चक्रण केंद्राबरोबर सांगड घालून साखळी निर्माण करणे इत्यादी हे नियमन प्रकाशित होण्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत मोक्याच्या ठिकाणी, जसे मॉल्स, मल्टीप्लेक्सेस, हॉटेल्स, दुकाने, पर्यटन स्थळे, सागरी चौपाट्या, किल्ले, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी कार्यान्वित करणे बंधनकारक असेल.

(ब) अशा वापरलेल्या बाटलीची दुकानदार, विक्रेते यांना छापलेल्या पुनर्खरेदी किमतीनुसार पुनर्खरेदी करणे बंधनकारक असेल.

(क) १ लीटर व त्यापेक्षा जास्त आणि १ लीटर पेक्षा कमी द्रवधारणा क्षमता असलेल्या पीईटी/पीईटीई बाटल्यांवर पुनर्खरेदी किंमत अनुक्रमे रुपये १ आणि रुपये २ अशी ठळकपणे छापलेली असावी."

२. परिच्छेद ७ मधील अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये "अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत" ऐवजी "अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. बी. एन. पाटील,**
संचालक (पर्यावरण).